RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना - NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.

वर्ष ४२ वे
अंक ९ वा
१० फेब्रुवारी २०२१
किंमत १ रूपया

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्मिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन





# विनम्र अभिवादन

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**''हे मातृभूमी तुजसाठी मरण ते जनन।**
**तुजविण जनन ते मरण ।।**

विसाव्या शतकातील क्रांतिकारकांचे मुकुटमणी असणाऱ्या विनायक दामोदर सावरकरांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावचा. २८ मे १८८३ रोजी जन्मलेल्या सावरकरांनी चाफेकर बंधूंच्या फाशीच्या शिक्षेने अस्वस्थ होऊन, वयाच्या १४ व्या वर्षी, 'माझ्या मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारून मारता मारता मरेतो झुंजेन' ही घेतलेली प्रतिज्ञा शेवटपर्यंत जगले. या जाज्वल्य देशभक्तीला आदर्श मानून क्रांतिकारकांची साखळी केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशभरात उभी राहिली. 'अभिनव भारत'चे निर्माते, कर्तव्यकठोर देशभक्ती असणारे, कडवे हिंदुत्ववादी, जातीभेदाला पराकोटीचा विरोध करणारा विचारवंत या सावरकरांच्या प्रतिमेबरोबरच बुद्धिवादी व विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून हिंदू तत्वज्ञानाची मांडणी करणारा साहित्यिक, समाजसुधारक म्हणून देखील सावरकरांची ओळख आपल्याला आहे. दोन जन्मठेपेच्या शिक्षा झालेला एकमेव क्रांतिकारक असलेल्या सावरकरांनी अंदमानाच्या तुरुंगात हालअपेष्टा सहन करून देखील ते निराश झाले नाहीत. रत्नागिरीच्या बंदिवासात त्यांनी अस्पृश्यता निवारण, सहभोजन, शुद्धीकरण मोहीम इ. उपक्रमांबरोबर सर्व जाती धर्माच्या लोकांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून पतितपावन मंदिराची उभारणी केली. हिंदुत्व, हिंदुपतपातशाही, माझी जन्मठेप, भारतीय स्वातंत्र्यसमर, जोसेफ मॅझिनी, मोपल्यांचे बंड, काळे पाणी, सहा सोनेरी पाने, रानफुले, इ. ग्रंथ संपदेमुळे त्यांनी १९३८ च्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी बजावलेल्या महान कामगिरीबद्दल त्यांना स्वातंत्र्यवीर म्हणून गौरविले गेले.

**जन्म : २८ मे १८८३ मृत्यू : २६ फेब्रुवारी १९६६**

## आम्हाला आपला सार्थ अभिमान आहे...

नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या नुकत्याच झालेल्या त्रैवार्षिक (२०२० ते २०२३) निवडणुकीमध्ये –
मा. सूर्यकांत रहाळकर – अध्यक्ष
संस्थेचे विश्वस्त प्रा. दिलीप फडके –उपाध्यक्ष, तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून सर्वश्री. मोहन रानडे, चंद्रशेखर वाड (सर), ॲड. जयदीप वैशंपायन यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याचबरोबर मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक गटातून अनुक्रमे, सौ. स्वाती परचुरे आणि सौ. वीणा जोशी यांचीही बिनविरोध निवड झाली आहे.

तसेच संस्थेचे देणगीदार, वामन हरी पेठे ज्वेलर्स चे मुख्य कार्यकारी संचालक श्री. दिलीप पेठे यांची नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त पदी बिनविरोध नेमणूक झाली आहे.

या सर्वांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन. सर्वांना भावी वाटचालीस खूप खूप शुभेच्छा. यांच्या सार्थ निवडीमुळे संस्थेस गतवैभव व लौकिक प्राप्त होईल याची खात्री वाटते.

## मराठे कुटुंबियांकडून संस्थेस देणगी



सौ. विद्या मराठे (अमेरिका) यांनी कोविड १९ या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर, ज्ञातीबांधवांना वैद्यकिय मदत व्हावी ह्या उदात्त हेतूने, त्यांच्या आई जयश्री शंतनू साठे यांच्या नावे रु. २०,०००/– ची देणगी संस्थेस दिली आहे.

साठे व मराठे कुटुंबियांनी ह्या पूर्वीही संस्थेस शैक्षणिक उपक्रमासाठी भरीव देणगी दिली असून त्यामधून संस्था हुशार व होतकरू विद्यार्थांना दरवर्षी शिष्यवृत्ती देत आहेच. संस्थेच्या स्तुत्य उपक्रमाचा गौरव करतानाच भविष्यातही आणखी शैक्षणिक देणगी देण्याचा मनोदय सौ. विद्या मराठे यांनी व्यक्त केला आहे.

देणगीबद्दल मराठे कुटुंबियांचे संस्थे च्या वतीने खूप खूप आभार व धन्यवाद. अशाच दातृत्व भावना असलेल्या देणगीदारांच्या भक्कम आधारामुळेच संस्थेस आपले कार्य अधिक जोमाने करण्यास उत्साह आणि मार्ग मिळतो.

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम,
प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

## मिहिर कन्स्ट्रक्शन

**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर,
रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल** : ०९४२२२४६८७८
**ईमेल :** cvranade@gmail.com

## Yoga after 50

it is never too late in life
to start practicing yoga.

**• Duration •**
1 month
(Online)
(Can be continued subsequently)

**• Timings •**
Starting from
15 February
5 days a week
9am - 10am

For more details
Contact - Devika Bhide - 8087404292
On Instagram - ghungroo_and_yogamat/
devika_bhide
Facebook - Devika Bhide
Asanas | Pranayam | Yognidra | Mudra | Mantra




**आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...**



## एक उपयुक्त दागिना...!

अदृश्य श्रवणयंत्र

अनेक नावाजलेल्या
कंपन्यांचे श्रवणयंत्र
उपलब्ध

**अनुभवी तज्ञांचे मार्गदर्शन**

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
**Ph.: 2318333, Mob : 9422269394**

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर,
VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक

* अटी लागू

## सामुहिक व्रतबंधन

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक तर्फे सामुहिक व्रतबंधन सोहळा, चैत्र कृ. ६ शके १९४३, रविवार, दिनांक २ मे २०२१ रोजी सकाळी ११.०७ वाजता आयोजित करण्यात आला आहे. व्रतबंध सोहळा संस्थेच्या
काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी नाशिक – ४२२००२ या ठिकाणी होईल.
अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संस्थेच्या ‘काका गद्रे मंगल कार्यालय’ येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. हा व्रतबंध सोहळा सर्वशाखीय ज्ञाती बांधवांसाठी आहे.

# सुखांत जीवनाचा

**लेखक : ॲड. अविनाश जनार्दन भिडे, नाशिक**

शेवटी त्या खोलीत एकदम शांतता झाल्याचे चैतन्यच्या जेव्हा लक्षात आले तेव्हा त्याने आणलेला डबा बाहेर काढला व निलेशला आग्रह करत स्वत: बरोबर त्यालाही दोन घास खाऊ घातले. तोपर्यन्त त्या खोलीतील इतर लोकांनीही त्यांनी आणलेले खाद्यपदार्थ खात, झोपायची किंवा निदान पाय पसरून पडायची तयारी सुरू केली होती. त्यामधील स्त्रीही सुमारे पन्नाशीच्या वयाची असावी. तिने तिच्या जवळच्या थर्मासमधून थोडा चहा की कॉफी प्यायली. अर्थात ती पण अस्वस्थच होती. सारखी अधून मधून उठून आय. सी. यु. च्या दाराच्या काचेच्या चौकोनातून आत डोकावत होती. तेथेच थोडी थबकत होती व परत येत होती.

चैतन्यने थोडे कुतुहलाने व संवाद साधण्यासाठी त्यांना विचारले, 'काकू, तुमचे कोण आहे पेशंट?' तिने तिचे पती ॲडमिट असल्याचे सांगत त्यांना पॅरालिसिस ॲटॅक आल्याचे व दोन्ही हाता पायातील संवेदना गेल्याचे सांगितले. ते सांगताना तिचा आवाज थरथरला, डोळ्यात टचकन पाणी आले. पण बाई हिंमतीची असावी, ती पटकन म्हणाली, ''३/४ दिवस झाले त्यांना ॲडमिट होऊन, पण अजूनही सुधारणा नाही.'' जागेवर जावून बसली. चैतन्यने थोड्या अपेक्षेने, कुतुहलाने इतर लोकांकडे नजरेनेच चौकशी केल्यासारखे केले. त्यामधल्या एकाने त्याच्या भावाला ॲक्सिडेंटमध्ये डोक्याला मार लागल्याचे व तो अजूनही शुध्दीवर आला नसल्याचे सांगितले. तिसऱ्याने त्याचा नातेवाईक न्यूमोनियामुळे छातीत पाणी झाले म्हणून आय.सी.यू. त ॲडमीट असल्याचे सांगितले.

एकमेकात थोडा का होईना पण संवाद झाल्यामुळे त्या खोलीतील वातावरण हलके झाले. निलेशही थोडा स्थिरावला होता. हळूहळू हॉस्पिटलमधील आवश्यक तेवढेच दिवे चालू रहात इतर दिवे बंद झाले. हॉस्पिटलमधील इतर हालचाली, लगबग देखील कमी झाली. चैतन्य व निलेशने कधी डुलकी घेत, कधी बाहेर मोकळ्या हवेत चक्कर मारत ती रात्र हॉस्पिटल मध्ये घालवली. दुसऱ्या दिवशी सकाळी, आज पुन्हा रात्री हॉस्पिटलमध्ये गरज असेल तर येतो, असे आश्वासन देत चैतन्यने निलेशचा निरोप घेतला व तो त्या दिवशीच्या ऑफिसच्या कामाचा विचार करीत घरी गेला.

निलेशच्या वडिलांचा कॅन्सर खूप उशिरा लक्षात आल्याचे व कॅन्सर सर्व शरीरात पसरला असल्याचे चैतन्याला दोन तीन दिवसांनंतर कळले. तसेच कोमात असलेला पेशंट अजूनही कोमातच असल्याचे व त्या स्त्रीच्या पतीचे पॅरालिसिसमुळे आता जिभेवरचेही नियंत्रण गेल्याचे समजले.

काही आजार हळूहळू विकोपाला जातात किंवा अचानक एखादी घटना घडते. चालताफिरता माणूस एकदम जायबंदी होतो व अंथरूणाला खिळून जातो आणि गलितगात्र होतो. हे असे आजार असतात की जे विकोपाला गेल्यानंतर माणूस पुन्हा बरा होण्याची तसेच धडधाकट होण्याची शक्यता नसते. तरी सुध्दा काहीवेळेला रूग्णाच्या इच्छेखातर किंवा बऱ्याच वेळेला रूग्णाचे नातेवाईक जसे की आई, वडील, पत्नी, बहीण, भाऊ, काका, आत्या यांच्या आग्रहाखातर यांत्रिक व तांत्रिक, रासायनिक किंवा जैविक औषधोउपचार चालू ठेवले जातात व त्याचे ठरलेले मरण आणखीन लांबवत नेले जाते. तो रूग्ण यातना सहन करीत राहतो, बाहेर त्याचे नातेवाईक मात्र आपल्या प्रयत्नांची पराकाष्टा करीत आपल्या माणसाला मरणाच्या दारातून बाहेर काढण्याच्या प्रयत्नात असतात. पण आपण त्या माणसाच्या शरीराची प्रयोगशाळा करीत आहोत याची जराही जाणीव त्यांना नसते. या सर्व खटाटोपात तो रूग्ण मात्र मरणाच्या यातना भोगत असतो औषधोपचारांचा उपयोग तर होतच नाही. रूग्ण मात्र तिळा तिळाने मरत असतो आणि त्याचे मरण लांबत राहते.

असाध्य आजार, दुर्धर रोग आणि असह्य वेदना सहन करणाऱ्या एखाद्या आय.सी.यू. मधील पेशंटची कल्पना करू या. ज्याचे मेंदूसकट सर्व शरीरातील अवयव कर्क रोगाने ग्रासलेले आहेत, तो व्हेंटिलेटरवर आहे, ज्याचे हृदय बंद होऊन डॉक्टरांनी प्रयत्नाची पराकाष्टा करीत परत चालू केले आहे. पण बाहेर असलेल्या नातेवाईकांना कळत नाही की ते त्याची बरी होण्याची वाट बघत आहेत की त्याला त्या त्रासातून मृत्यूने सोडवायची वाट बघत आहेत. अशा पेशंटचे व्हेंटिलेटर काढणे किंवा औषधोपचार थांबविणे मानसिकदृष्ट्या किती अवघड असते ! त्यांची आर्थिक, भावनिक ओढाताण स्पष्ट दिसत असते. तांत्रिकदृष्ट्या डॉक्टर असा निर्णय घेऊ शकत नाहीत. या मध्ये त्या पेशंटची मात्र कधीकधी शब्दश: कुत्तर ओढ होत असते.

ग्रीस देशातील एक गोष्ट आहे. सिफीयस नावाचा एक

सरदार तेथे छोट्या प्रदेशांवर राज्य करत होता. परंतु त्याची फसवाफसवी, लोकांची पिळवणूक व इतर बेकायदेशीर वर्तनामुळे त्याला तेथील राजाने एक शिक्षा दिली. त्या शिक्षेचे स्वरूप होते की सिफीयसने त्याचे शरीराच्या आकारापेक्षाही खूप मोठा गोल दगड स्वतःच्या हातांनी, एका टेकडीवर घेऊन जायचा. सिफीयस प्रयत्नपूर्वक तो गोल दगड ढकलत त्या टेकडीवर घेऊन जायचा, पण काही अंतर गेल्यावर तो दगड स्वतःच्याच वजनाने पुन्हा गडगडत खाली यायचा. या प्रकारामुळे सिफीयस त्याला दिलेली शिक्षा पूर्ण करू शकला नाही व शेवटपर्यंत दगड टेकडीवर ढकलत नेत राहिला. किती प्रयत्न केले तरी तो यशस्वी होत नव्हता व होणारही नव्हता. या सर्व प्रयत्नांना, जे निष्फळ होते व आहेत, यांना **'सिसफीयन ॲटेम्पट'** असे नाव पडले.

**'टर्मिनल इलनेस'** जो आजार अती गंभीर झाला आहे. जसे की पूर्ण शरीरात कॅन्सर पसरलाय किंवा काही कारणाने पेशंट पूर्ण विकलांग, पॅरलाईज झालाय किंवा तो कोमात गेलाय, तो आजाराच्या अशा स्थितीत आहे की कितीही व कोणतेही औषधोपचार केले तरी ते वर उल्लेखलेल्या गोष्टीप्रमाणे सिसफीयन प्रयत्नच ठरतात. रूग्णाचा आजार मात्र आणखीच बळावत जातो, रूग्ण मरणासन्न यातना भोगत रहातो व त्या सहन करत जगत राहतो पण शेवटी उपयोग होत नाही. रूग्णाचे मरण फक्त काही काळासाठी पुढे ढकलले जाते इतकेच. सुरू झालेली मरणाची प्रक्रिया थांबत मात्र नाही, ती फक्त मंदावते.

**आय.सी.यु.... आत व बाहेर**

त्या दरम्यान चैतन्यने सहज आय. सी. यू. च्या रेस्टरूम मध्ये चक्कर मारली तेव्हा पूर्वी भेटलेल्या त्या काकू, ज्यांच्या पतीला पॅरालिसीस झाला होता. त्या तेथे बसलेल्या दिसल्या. त्यांची विचारपूस करता त्यांच्या पतीची परिस्थिती आणखीनच खालावत असल्याचे समजले. त्याचप्रमाणे पेशंट आय.सी.यु. मध्ये असल्यामुळे त्यांना त्यांच्या पतीशी नीट बोलता येत नाही, त्यांना तेथे थांबता येत नाही ही खंत त्यांनी व्यक्त केली. त्यांनी पण आजपर्यंत इतरांनी जे जे उपाय सुचविले ते अगदी गंडेदोरे व अंगारा वगैरे सर्व उपाय केल्याचे सांगितले. पण उपयोग होत नव्हता. त्याचप्रमाणे ॲक्सिडेंट झालेला पेशंट अजूनही कोमात असल्याचे व व्हेंटिलेटरवर असल्याचे त्याला कळले.

ते ऐकून चैतन्यच्या मनात विचार चमकून गेला की एकंदरीत परिस्थिती बघता दोन्ही पेशंट **''टर्मिनली ईल''** अशा परिस्थितीत होते. तर मग त्या त्या रुग्णाला त्यांच्या शेवटच्या क्षणी का होईना त्यांच्या जवळचे नातेवाईकांचा सहवास मिळू नये? उगाचच निष्फळ प्रयत्न करून त्या रूग्णाला आणखीन सुया टोचून, यांत्रिक, रासायनिक किंवा इतर औषधोपचार करीत केवळ जिवंत ठेवण्याचा प्रयत्न का केला जातो? या गडबडीत पेशन्टच्या शारीरिक हाल, या व्यतिरिक्त त्यांच्या जवळच्या नातेवाईकांची मानसिक घालमेल, दुःख, यातनांचा पण का विचार केला जात नाही असे व अनेक वेगवेगळे विचार चैतन्यच्या मनात घोळू लागले. त्यामुळेच की काय, चैतन्यने दोन/तीन दिवसांनी एका कॅन्सर स्पेशालिटी हॉस्पिटलला भेट दिली व कुतुहलाने पण समंजसपणे तिथे असलेल्या पेशंटच्या नातेवाईकांकडे विचारपूस सुरू केली.

जी माहिती त्याला मिळाली त्यामुळे त्याचे मन सुन्न झाले. एक महिला ज्यांचे वय साठपेक्षा जास्त होते त्या कॅन्सर व डिमेन्शिया या आजाराने आजारी होत्या व आजार विकोपाला गेलेला होता. शेवटी त्या **परमनंट व्हेजीटेटिव्ह स्टेज (PVS) मध्ये गेल्या.** तरी सुद्धा त्या पेशंटचे नातेवाईक त्यांचे जरूर ते ऑपरेशन करावे म्हणून डॉक्टरांना आग्रह करीत होते. तोपर्यंत त्या पेशंटवर होमिओपॅथी, आयुर्वेद व इतर सर्व प्रकारच्या औषधांचा मारा पण झालेला होता. म्हणतात ना, माया वेडी असते. पण त्या भरात आपण त्या पेशंटच्या शरीराचे किती हाल करतो ह्याचे भानच लोकांना राहात नाही. शेवटी त्या महिला पेशंट त्या परिस्थितीतच वारल्या.

त्याच वॉर्डात एक अडोतीस वर्षांचा तोंडाचा कॅन्सर झालेला पेशंट होता. तंबाखू, गुटखा खाऊन रोग बळावला होता. लहान वयातच आजार ॲडव्हान्स स्टेजला गेलेला होता. डॉक्टरांनी औषधोपचार थांबवून पेशंटला घरी घेवून जा, त्याच्या पत्नी, लहान मुलांबरोबर राहू द्या. त्याला केवळ वेदना होणार नाहीत अशी औषधे देऊ असे सांगूनही पेशंटचे नातेवाईकांनी त्याच्यावरील क्लिनिकल ट्रायल्स चालूच ठेवण्याची जिद्द केली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. तेथेच कर्नाटकातून एक पेशंट आल्याचे व त्याला ॲक्युट ल्यूकेमीया जो ॲडव्हान्स स्टेजला गेल्याचे समजले. परंतू त्या पेशंटची आत्या मात्र वेडीपीशी होवून नाही नाही ते प्रयत्न करत होती. अगदी बाबा बुवांकडची जडीबुटी पण त्यांनी त्याला खायला घातली. पण शेवटी उपयोग झाला नाही. अशाच एका पेशंटला तो ॲडव्हान्स स्टेजला जाईपर्यन्त त्याला घरीच सर्व प्रकारचे औषधोपचार केले गेले.

**(क्रमशः)**

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ४६५ | **चैतन्य रमेश दिवेकर**<br>फ्लॅट नं. १ श्री तिरूमाला ग्लोरी अपार्टमेंट, राजीव नगर नाशिक - ४२२ ००९, मो.:७७०९४६६६०९ | २५/०८/१९९६ | वशिष्ठ | ५'.८'' | P.G.D.M | ४०,०००/- |
| ४६६ | **संकेत माधव आवळसकर**<br>ब्राम्हण संघ बिल्डींगजवळ, विवेकानंद पथ, मु.पो. दिवेआगर ता.श्रीवर्धन जि. रायगड -४०२४०४<br>मो.:९९२१८८५२२३ / ९०७५६२५८६१ | २३/०२/१९८६ | अत्री | ५'.१०'' | बी.ई. (मेकॅनिकल) | ३५,०००/- |
| ४६७ | **पराग अविनाश कुलकर्णी**<br>५/९ सिद्ध - गौतम हौसिंग सोसायटी, माणेकशा नगर, रविंद्र हायस्कूलजवळ, द्वारका नाशिक - ४२२०११, मो.:९९७५०१२२६६<br>फोन : ०२५३-२५९२४१६ | ११/०९/१९८० | हरितस | ५'.२'' | बी.ए. | २०,०००/- |
| ४६८ | **समीर श्रीकांत खरे**<br>८ अमरभूपाळी अपार्टमेंट, दुसरा मजला, महात्मा नगर, नाशिक - ७<br>मो.:७६२०५९६०४५ / ९५१८९७२५४१ | ०९/०९/१९८७ | कौशिक | ६'.२'' | बी.कॉम एम.बी.ए. | २०,०००/- |
| ४६९ | **अभिषेक शैलेंद्र कुलकर्णी**<br>फ्लॅट नं. ५, मंगलमूर्ती टॉवर, जानकी विश्व, येवला नाका, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर<br>मो.: ८७८८५५३३६८, ९८२२१२६३१९ | २६/०४/१९९५ | शांडिल्य | ५'.९'' | बी.बी.ए. पीजीडीएम मार्केटिंग | ५०,०००/- |
| ४७० | **राजेश भालचंद्र मालसे**<br>१३, गोपालनगर सोसायटी, शास्त्रीबाग रोड. महादेव तलाव (पूर्व), वडोदरा, गुजरात,<br>मो.: ९३७५५८७००७ | १९/०८/१९६७ | वत्स | ५'.७'' | आर्किटेक्चर ड्राफ्टस्मन आय.टी.आय. | २,००,०००/- वार्षिक |
| ४७१ | **आनंद अविनाश गोडबोले**<br>सिद्धी रेसिडेन्सी, जैन स्कूलजवळ, शहानुरवाडी औरंगाबाद ४३१००५<br>मो.: ७५८८४४४१७६ | १२/०१/१९८९ | कौशिक | ५'.९'' | बी.ई. डिप्लोमा | ३०,०००/- |
| ४७२ | **ऋषिकेश अविनाश गोडबोले**<br>सिद्धी रेसिडेन्सी, जैन स्कूलजवळ, शहानुरवाडी औरंगाबाद ४३१००५<br>मो.: ७५८८४४४१७६ | ०१/०७/१९९१ | कौशिक | ५'.७'' | बी.ई. | ७५,०००/- |
| ४७३ | **प्रतिक राजन दांडेकर**<br>फ्लॅट नं. ५, साईविहंग सो. पारिजात नगर, नाशिक - ४२२००५, मो.:९५११७८३८९८ | १०/०४/१९९० | वशिष्ठ | ५'.४'' | M.Com. | १.३० वार्षिक |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| २१५ | **गौरी श्रीपाद डोंगरे**<br>४/६, वैष्णव संकुल, लॅम रोड, दत्त पेट्रोल पंप समोर, महाराजा स्टॉप, नाशिकरोड ४२२१०१<br>मो.: ७८७५५४८२४५ | ०५/०९/१९९२ | शांडिल्य | ५' | M.A. English<br>M.A. Psychology<br>B.Ed. | – |
| २१६ | **मैत्रेयी धनंजय दामले**<br>सुधा बंगला, प्लॉट नं. १२, स.नं. १०२/१, शिव कॉलनी, वडाळा पाथर्डी रोड, नाशिक ४२२००९<br>मो.: ७७२००६५५७४, ९८२२८७६८४१ | ०३/०९/१९९६ | शांडिल्य | ५'.४'' | एम.एस.सी मायक्रो. | २०,०००/– |
| २१७ | **मानसी नंदकुमार बाळ**<br>सी. ९, तिरुमला आस्था, चेतना नगर, नाशिक ४२२०१०<br>मो.: ९८५०३१५३९४ | २१/०४/१९९५ | बाभ्रव्य | ५'.३'' | बी.कॉम. | – |
| २१८ | **डॉ.भाग्यश्री महेश गोखले**<br>ए–१६, दि. रेनिसन्स अपार्ट, दामोदर फडके नगर, गोविंद नगर, नाशिक – ९, मो.:७२७६५२६९३९ | २१/०७/१९९४ | काश्यप | ५'.४'' | डॉक्टर | ३५०००/– |
| २१९ | **ऐश्वर्या सुशांत करमरकर**<br>दत्त अपार्टमेंट, बालिकाश्रमरोड, सावेडी, अहमदनगर – ४१४००३, मो.:८४२१७४३०२५ | २६/१०/१९९६ | काश्यप | ५'.६'' | एम.एस्सी | – |

## भावपूर्ण श्रद्धांजली



संस्थेचे सभासद, चि. प्रथमेश मोहन फाटक यांचे वडील **श्री. मोहन चिंतामण फाटक** यांचे अल्पशा आजाराने दि. २९ डिसेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५६ वर्षे होते. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## पाहिजे

**संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती संकलित करण्याच्या कामासाठी अर्धवेळ, पूर्ण वेळ होतकरू व उत्साही विद्यार्थी अथवा तरुण मदतनीस पाहिजे. योग्य मोबदला देण्यात येईल. अपेक्षेसह अर्ज संस्थेच्या कार्यालयात दाखल करणे.**

**परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेसाठी कॅशियर कम क्लर्क महिला उमेदवार भरणे आहे. अनुभव असल्यास उत्तम. किमान पदवीधारक असणे आवश्यक आहे. गरजू उमेदवारांनी पगाराच्या अपेक्षेसह पतसंस्थेत अर्ज करावा.**

## श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था व टकले बंधू यांच्या संयुक्त विद्यमाने

# सुवर्ण संचय समृद्धी योजना

बघता बघता वर्ष-दोन वर्षावर मुला मुलींचं लग्न येऊन ठेपलं आहे!

गुंतवणुकीचा उत्तम व खात्रीशीर पर्याय शोधत आहात ?

सोने खरेदी करायचे आहे? शेअर मार्केट धक्के देतंय?

पण महागाई व वाढत्या भावामुळे शक्य होत नाहिये?

**थांबा, काळजी करू नका, आपली ही काळजी दूर झाली आहे.**

तुमच्या सोयीने हवे तेवढे सोने आजच खरेदी करा. ते पण सोन्याच्या आजच्या भावाच्या फक्त २५% रक्कम भरून. उर्वरित रकमेची सुलभ मासिक हप्त्यांमध्ये एका वर्षात परतफेड करा. लग्नात लागणारी अपरिहार्य गोष्ट किंवा वर्षानुवर्षांपासून सिद्ध झालेला उत्तम गुंतवणुकीचा पर्याय म्हणून देखील सोने हाच पर्याय आहे.

**आमचे ध्येय... "तुमची धनसमृद्धी"**

अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.

**श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था**
फोन : (०२५३) २३१३७०९/ ९१६८४२६८८८

**टकले बंधू, सराफ बाजार**
फोन : ०२५३-२५९४१५४, २५९६६५४, २५९९०५४

**विचार कसला करताय, येताय ना मग !**



चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक- २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ - २५७६२४१**


प्रति, ______________________

______________________

______________________


**संस्थेची वेबसाईट :-**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://facebook.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan



या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.